# ‘सारथी’ गणेश उत्सव गाईड २०२३

पुणे पोलीस
Pune Police

उत्सव श्रीगणेशाचा...



सारथी

गाईड
२०२३

पुणे शहर वाहतूक पोलीस
PUNE CITY TRAFFIC POLICE

***Follow Link***

***to make your experience more convenient***

https://www.google.com/maps/d/edit?mid=1mozfYB4iJRyqUNEzBnnUcjK4UIHVD4U&usp=drive_link

- पुणे पोलीस वाहतूक शाखेतर्फे नागरिकांना गणेश उत्सव कालावधीमध्ये प्रवास सहज सुलभ हाईल तसेच शहराच्या मध्यवर्ती भागामधील प्रतिष्ठीत गणपती मंडळांचे अंतर व वाहनांचे पार्किंगची सुविधा एका क्लिकवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या ‘सारथी’ गणेश उत्सव गाईड २०२३ चे लिंकचे अनावरण महाराष्ट्र राज्याचे उप मुख्यमंत्री तथा गृहमंत्री मा. नामदार श्री. देवेंद्र फडणवीस, मा. श्री. रितेश कुमार, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे हस्ते व श्री. अमर साबळे माजी खासदार, श्रीमती माधुरीताई मिसाळ, आमदार, मा.श्री. सिध्दार्थ शिरोळे, आमदार, मा. श्री. जगदीश मुळीक, माजी आमदार, मा. श्री. संदिप कर्णिक, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर, श्री. विजयकुमार मगर, पोलीस उप आयुक्त, वाहतूक शाखा, पुणे शहर, श्री. मुरलीधर मोहोळ, माजी महापौर पुणे शहर, श्री. श्रीनाथ भिमाले, माजी सभागृह नेते, श्री. श्रीकांत शेटे, अध्यक्ष कसबा गणपती मंडळ व इतर मान्यवर यांचे उपस्थित करण्यात आले.
- पुण्यातील गणेश उत्सव अनुभवायचा असेल तर पुणे शहराच्या मध्यवर्ती भागात यावे लागते. शहराच्या मध्यवर्ती भागातील मुख्य गणेश मंडळे या ठिकाणी गर्दी होत असते. तेथे दर्शनाकरीता येणाऱ्या भाविकांच्या वाहनांचे पार्किंग करीता जवळची वाहनतळे यांची खात्रीशीर माहिती तसेच उत्सव काळातील बंद रस्ते, पर्यायी चालू रस्ते यांची माहिती असलेले हे गाईड बाप्पाचे दर्शन घेण्यासठी उपयुक्त ठरेल !

- पुण्याला लाभलेल्या या ऐतिहासिक आणि परंपरागत उत्सवात अधिकाधिक नागरिकांना व पर्यटकांना सहभागी होता यावे या उद्देशाने 'सारथी' गणेश उत्सव गाईड २०२३ ची निर्मिती केली आहे.

**'सारथी' गणेश उत्सव गाईड २०२३ चे वैशिष्टये**

- या गाईडचे माध्यमातून शहराचे मध्यवर्ती भागातील मुख्य गणेश मंडळे, वाहनतळ, यांचा मार्ग पाहता येणार आहे.
- **वाहनतळ :-** एकुण ५ शाळा, ७ कॉलेज यांचे मैदान संध्याकाळी १८.०० ते दुसऱ्या दिवशी पहाटे ०४.०० वा. पर्यंत उपलब्ध होणार आहे. तसेच पार्किंग करिता पुणे मनपाकडील, इतर खाजगी वाहनतळ, नदीपात्र इ. ठिकाणांची माहितीही लोकेशननुसार उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
- उत्सव काळातील बंद रस्ते व त्यांचे पर्यायी मार्ग यांचे मार्गदर्शन लाभेल.
- गणेश उत्सव काळातील शहरातील रिंगरोडची माहिती या मॅपवर असेल.
- उत्सव काळात शहरतील मध्यवर्ती भागातील अवजड वाहतूकीसाठी बंदी असलेले मार्ग यांची माहिती मिळू शकेल.
- तसेच उत्सव काळात गणेश मुर्ती विसर्जन घाटांची माहिती लोकेशनसह मिळणार आहे.
- जास्तीत जास्त नागरिकांना पुण्यातील गणेश उत्सव अनुभवणे सोईस्कर व्हावे याकरिता 'सारथी' गणेश उत्सव गाईड लिंक व क्यू आर कोडची प्रसिध्दी सोशल मिडीया, वृत्तपत्र, सर्व वाहनतळ, बसस्थानके, रेल्वे स्थानके, खाजगी ट्रव्हल्स थांबे, महत्वाचे चौक, गणेश मंडळे, शहरातील सर्व उपलब्ध एल.ई.डी. स्क्रिनवर या ठिकाणी बॅनर स्वरुपात लिंकची माहिती उपलब्ध केली जाईल.

- <u>'सारथी' गणेश उत्सव गाईड -२०२३ :-</u>
  - ✓ क्यू.आर. कोड अथवा लिंक ओपन केल्यानंतर View map legend या option मध्ये मॅपवर मध्यवर्ती भागातील महत्वाची गणेश मंडळे, पार्किंग ठिकाणे, बंद रस्ते, रिंग रोड, जड वाहतूकीस बंद रस्ते, पर्यायी रस्ते याची माहिती देण्यात आलेली आहे.
  - ✓ मॅपवर दिलेल्या वाहनतळ / गणेश मंडळ आयकॉनवर क्लिक केलेनंतर नागरिकांना इच्छितस्थळी जाणेकरीता उपलब्ध असलेल्या मार्गाची माहिती मिळू शकेल.
  - ✓ त्याचप्रमाणे नागरिकांना त्यांचे लोकेशनपासून गणेश मंडळे अथवा वाहनतळ इ. ठिकाणी पोहचणे करिता डायरेक्शनव्दारे मार्ग पाहता येणार आहे.
  - ✓ सदर मार्गादरम्यान बंद असलेले रस्ते जागीच समजतील.

तरी सर्व सोशल मिडीया व वृत्तपत्र संस्था यांना आवाहन करण्यात येते की, गणेश उत्सव कालावधीत नागरिकांकरीता सुविधा निर्माण व्हावी याकरीता ‘सारथी’ गाईड २०२३ ही लिंक व क्यू.आर.कोड प्रसारीत करण्यात यावे.

https://www.google.com/maps/d/edit?mid=1mozfYB4iJRyqUNEzBnnUcjK4UIHVD4U&usp=drive_link

